

देगलूर : देगलूर महाविद्यालयात बक्षिस वितरण कार्यक्रम पार पडला.

# देगलूर महाविद्यालयात बक्षिस वितरण कार्यक्रम

देगलूर : देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्राच्यावतीने संविधान दिनाच्या निमित्याने आयोजित वक्तृत्व व निबंध स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, एम.एम. चमकुडे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. विजयी विद्यार्थ्यांना युपीएससी व एमपीएससीसाठी उपयुक्त संदर्भ ग्रंथ भेट देण्यात आले.

निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक दत्ता संजय तालिमकर, द्वितीय क्रमांक वैष्णवी मारोती वाघमारे, तृतीय क्रमांक स्वाती संजय लोखंडे व उत्तेजनार्थ : लोणे संघरत्ना तुकाराम यांनी बक्षीस प्राप्त केले आहे. तर वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पुजा गोविंद अकुलवाड, द्वितीय क्रमांक : वैष्णवी हणमंतराव झाडे, तृतीय क्रमांक अजय दत्तात्रय इंदूरकर व उत्तेजनार्थ स्वाती संजय लोखंडे याप्रमाणे वक्तृत्व स्पर्धेतील विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले आहे. या प्रसंगी पर्यवेक्षण व परीक्षणाचे कार्य लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ.बी.आर. कतूरवार, प्रा. डॉ. संजय देबडे, प्रा. धनराज लजडे व प्रा. बालाजी कोंकटवार यांनी केले आहे.

Scanned with OKEN Scanner